# अमरावती महानगरपालिका, अमरावती

राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१ विद्युत विभाग ई-मेल:- ee1pwdamc@gmail.com


जा.क्र. अमनपा/प्रवि/शअ/ ६४/२०२५ दिनांक — २० /०३ /२०२५

## परिपत्रक

माझे असे निदर्शनास आले आहे की, महानगरपालिका झोन कार्यालये तसेच मुख्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कार्यालयीन कामकाज संपल्यावर देखील अनावश्यक वीज वापर सुरू असून वीज उपकरणे जसे पंखे, दिवे, वातानुकूलित यंत्र इत्यादी कार्यालयीन कामकाजानंतर देखील सुरू ठेवण्यात येत आहेत. यामुळे विजेचा अपव्यय होत असून कार्यालयीन विजेच्या देयकामध्ये वाढ होत आहे.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८ / प्र. क्र. ९६ / इमारती-२ दि. २४/०८/२०१८ मधील "शासकीय कार्यालये व विश्रामगृहे तसेच इतर इमारतींमधील सर्व वातानुकुलन यंत्रे तसेच यंत्रणेचे तापमान २४ डिग्री ठेवण्यात यावे. (वा तापमान २४ डिग्री राहील असे सुनिश्चित करावे.) अशा प्रकारे वातानुकुलन यंत्रणेचा सुयोग्य वापर केल्यास उर्जा निर्माण करणा-या स्त्रोतांचा मर्यादित वापर होऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यास हातभार लावता येईल व पर्यायी शासनाची आर्थिक बचत होईल." या सुचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

यास्तव, सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख यांनी आपल्या कार्यालयातील विजेचा अपव्यय टाळण्याबाबत आपले अधिनस्त कर्मचाऱ्यांना अवगत करावे व तसेच कार्यालयीन कामकाज संपल्यावर सर्व स्विच बंद केल्याची खात्री करण्याबाबत सूचित करावे.

शहर अभियंता
अमरावती महानगरपालिका, अमरावती

प्रति,

सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख
अमरावती महानगरपालिका, अमरावती

प्रतिलिपी:-

१) मा. आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना माहितीस सविनय सादर.
२) मा. अतिरिक्त आयुक्त १, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना माहितीस.
३) मा. अतिरिक्त आयुक्त २, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना माहितीस.
३) मा. उप-आयुक्त १, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना माहितीस.
४) मा. उप-आयुक्त २, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना माहितीस.
५) मा. उप-आयुक्त ३, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना माहितीस.
६) सिस्टिम मॅनेजर, संगणक विभाग, सदर परिपत्रक अमरावती मनपाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.

वातानुकुलन यंत्रणेचा सुयोग्य
वापर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.९८/इमारती-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २४/०८/२०१८

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालयात मोठया प्रमाणात वातानुकूलन यंत्रणेचा वापर होतो. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, त्यातील ब-याच ठिकाणी त्याचे तापमान १८ ते २० डिग्री से.असे ठेवण्यात येते. त्यामुळे अनावश्यक वीजेचा वापर होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होते व उर्जा निर्माण करणा-या स्त्रोतांचा वापर अधिक प्रमाणात होऊन पर्यावरणाचा समतोल बिघडतो. याबाबत केंद्र सरकारच्या ब्युरो ऑफ एनर्जी ईफिशियन्सी (BEE) व्दारे असे सूचित करण्यात आले आहे की, वातानुकुलन यंत्रणा २४ डिग्री से.तापमानावर वापरले असता, २४% विजेची बचत होऊ शकते व हे तापमान मानवी शरीराला आवश्यक आर्द्रता आणि योग्य हवेचे अभिसरणाकरीता सर्वोत्तम आहे. यामुळे बाहेरुन येणा-या व्यक्तींना तापमानातील विषम बदलाला सामोरे जावे लागत नाही. सदर तापमान वातावरणास पोषक व ग्रीन बिल्डींग संकल्पनेस पूरक राहील. या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करुन खालील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत असून त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

**शासन निर्णय -**

" शासकीय कार्यालये व विश्रामगृहे तसेच इतर इमारतींमधील सर्व वातानुकुलन यंत्रे तसेच यंत्रणेचे तापमान २४ डिग्री ठेवण्यात यावे. (वा तापमान २४ डिग्री राहील असे सुनिश्चित करावे.) अशा प्रकारे वातानुकुलन यंत्रणेचा सुयोग्य वापर केल्यास उर्जा निर्माण करणा-या स्त्रोतांचा मर्यादित वापर होऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यास हातभर लावता येईल व पर्यायी शासनाची आर्थिक बचत होईल."

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०८२७१५५८१४०२१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Sanjay Uttarwar

Digitally signed by Sanjay Uttarwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cab21a54ad660ded981a3eca6138 0e321e245c3a783fe22e29d3e1080185a683, serialNumber=23844598153e02b0343bb88 41e656191857a573661abb05577db911eb5 e3ded7, cn=Sanjay Uttarwar
Date: 2018.08.27 16:00:07 +05'30'

**( सं.मु.उत्तरवार )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत-**

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
३) सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग व (विद्युत) विभाग
यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना सदर शासन निर्णयाची प्रत अग्रेषित करावी.
४) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ व (विद्युत) विभाग
६) संचालक, उपवने व उद्याने, मुंबई
७) निवडनस्ती (इमा-२) संग्रहार्थ.